**ठळक बातम्या**

- राज्यातल्या सर्व २४३ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकीची मतमोजणी येत्या २१ डिसेंबरला करण्याचे मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर पीठाचे आदेश

- घोषित केलेल्या निवडणुका पुढे ढकलल्या जाणं हे यंत्रणांचं अपयश असल्याची मुख्यमंत्र्यांची प्रतिक्रीया, विरोधकही नाराज

- मतदार याद्यांचं पुनरिक्षण आणि इतर मुद्द्यांवरुन संसदेत गदारोळ, लोकसभेचं कामकाज दिवसभरासाठी स्थगित.

**आणि**

- नाशिकच्या महाविद्यालातल्या सहलीच्या बसचा कराडजवळ अपघात, सुमारे ४५ जण जखमी

**<><><><><>**

राज्यातल्या सर्व २४३ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकीची मतमोजणी येत्या २१ डिसेंबरला करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिले आहेत. सुरवातीच्या कार्यक्रमानुसार या सर्व जागांसाठी आज मतदान होणार होतं, मात्र न्यायालयीन अपील झालेल्या नगरपरिषदा आणि नगरपंचायतींमध्ये २० डिसेंबरला मतदान घेण्याचा निर्णय निवडणूक आयोगाने घेतला. यामध्ये २४ नगराध्यक्ष आणि २०४ सदस्यांच्या जागांचा समावेश आहे. त्यामुळे आज एकूण २६४ नगरपरिषदा आणि नगरपंचायती जागांसाठी मतदान होत आहे.

सर्व निवडणुकांचे निकाल एकाच दिवशी जाहीर व्हावेत, अन्यथा २० नगरपरिषदांच्या निकालावर प्रभाव पडू शकतो, अशी याचिका उच्च न्यायालयाच्या नागपूर पीठासमोर दाखल करण्यात आली होती. त्यावर आज झालेल्या सुनावणीत न्यायालयाने सर्व निकाल एकत्र २१ डिसेंबरला जाहीर करण्याचे आदेश दिले. तसंच या निवडणुकीचे एक्झिट पोलही २०डिसेंबरला निवडणूक संपल्यानंतर अर्धा तासाने जाहीर करता येतील, आणि नगरपरिषद

आणि नगरपंचायत निवडणुकीची आदर्श आचारसंहिताही २० डिसेंबरपर्यंत लागू राहील, असंही न्यायालयाने स्पष्ट केलं.

**<><><><><>**

घोषित केलेल्या निवडणुका पुढे ढकलल्या जात आहेत, हे यंत्रणांचं अपयश असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. यावर आपण याआधीही नाराजी व्यक्त केल्याचं त्यांनी आज मुंबईत वार्ताहरांशी बोलताना सांगितलं.

तर न्यायालयाच्या या आदेशामुळे निवडणुकीचा खेळखंडोबा झाला असून, याला राज्य सरकार जबाबदार असल्याचा आरोप काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केला. ते नागपूर इथं वार्ताहरांशी बोलत होते.

**<><><><><>**

दरम्यान राज्यातल्या २२२ नगरपंचायती आणि नगरपरिषदांसाठी आज शांततेत मतदान सुरु आहे. त्याविषयीच्या बातम्या आमच्या ठिकठिकाणच्या वार्ताहरांनी दिल्या आहेत ऐकूया अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून

- **- - व्हॉईस कास्ट- श्रद्धा.....**

*(सकाळी साडे अकरा वाजेपर्यंत १७ पूर्णांक ११ शतांश टक्के मतदान झालं आहे.*

***पालघर** जिल्ह्यात डहाणूमध्ये मतदार याद्यांमध्ये घोळ कायम असल्याने दुबार नाव असलेल्या मतदारांना मतदानापासून रोखलं आहे.*

***रायगड** जिल्ह्यात उरण तालुक्यामध्ये मोरा इथल्या मतदान केंद्रावर महाविकास आघाडी आणि महायुतीच्या कार्यकर्त्यांत वादावादी झाल्याची घटना घडली आहे.*

***रत्नागिरी** जिल्ह्यात सकाळी साडेअकरापर्यंत एकूण ३० पूर्णांक ८९ शतांश टक्के मतदान झालं आहे.*

***नाशिक** जिल्ह्यात ११ नगरपालिकांसाठी आज सकाळपासून शांततेत मतदान सुरू झालं आहे.*

***कोल्हापूर** जिल्ह्यात १० नगरपरिषदा आणि तीन नगरपंचायतींसाठी आज अत्यंत चुरशीने मतदानाला सुरुवात झाली. कागल तालुक्यात किरकोळ वादावादी वगळता सर्व ठिकाणी शांततेत मतदान सुरू असल्याची माहिती पोलिस प्रशासनाने दिली आहे.*

***सांगली*** *जिल्ह्यातल्या सहा नगरपरिषद आणि दोन नगरपंचायतींच्या निवडणुकीसाठी मतदान सुरू असून दुपारी दीड वाजेपर्यंत ४१ पूर्णांक ६७ शतांश टक्के मतदान झालं आहे.*

***छत्रपती संभाजीनगर*** *जिल्ह्यात कन्नड, सिल्लोड, पैठण, खुलताबाद, गंगापूर आणि वैजापूर नगरपरिषदेसाठी मतदानाला उत्साहात सुरवात झाली.*

***जालना*** *जिल्ह्यात नगरपरिषद निवडणुकीसाठी शांततेत मतदान सुरु आहे.*

***लातूर*** *जिल्ह्यात दुपारी दीड वाजेपर्यंत ३८ पूर्णांक २१ शतांश टक्के मतदान झालं आहे.*

***नांदेड*** *जिल्ह्यात १० नगरपरिषदा आणि एका नगर पंचायतीसाठी मतदान होत आहे.*

***हिंगोली*** *नगरपालिका निवडणुकीत मतदान केल्यानंतर घोषणाबाजी केल्यामुळे आमदार संतोष बांगर यांच्यावर गोपनीयता आणि आचारसंहितेचा भंग केल्याच्या आरोपाखाली निवडणूक आयोगाकडे तक्रार करण्यात आली आहे. याबाबतचा अहवाल मतदान केंद्र प्रमुखाकडून मागवून पुढची कारवाई करण्यात येईल असं निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी सांगितलं आहे.*

***धाराशिव*** *जिल्ह्यात सकाळी साडे अकरा वाजेपर्यंत २२ पूर्णांक ८१ शतांश टक्के मतदानाची नोंद झाली.)*

**<><><><><>**

राज्यातल्या २४ नगरपरिषद, नगरपंचायतींमध्ये तसंच विविध ठिकाणच्या १५४ नगरसेवक पदासाठी २० डिसेंबरला मतदान होणार आहे. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरुद्ध जिल्हा न्यायालयात अपील झालेल्या प्रकरणांमध्ये २३ नोव्हेंबर किंवा त्यानंतर निर्णय आल्यानं राज्य निवडणूक आयोगानं हा निर्णय घेतला आहे. सुधारित कार्यक्रमानुसार आता १० डिसेंबरला दुपारी ३ वाजेपर्यंत माघार घेता येईल. अंतिम उमेदवार यादी आणि निवडणूक चिन्हांचं वाटप ११ डिसेंबरला होईल आणि २० डिसेंबरला सकाळी साडे ७ ते संध्याकाळी साडे ५ दरम्यान मतदान होईल. मतमोजणी २१ डिसेंबरला सकाळी १० वाजता सुरू होईल. या २४ नगरपरिषद, नगरपंचायतींमध्ये अंबरनाथ, कोपरगाव, देवळाली प्रवरा, पाथर्डी, नेवासा, बारामती, फुरसुंगी, उरुळी देवाची, अनगर, मंगळवेढा, महाबळेश्वर, फलटण, फुलंब्री, मुखेड, धर्माबाद, निलंगा, रेणापूर, वसमत,

अजंनगाव सूर्जी, बाळापूर, यवतमाळ, वाशीम,  देऊळगावराजा, देवळी आणि घुग्घूस यांचा समावेश आहे.

<><><><><>

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या आजच्या दुसऱ्या दिवशी मतदारयाद्यांच्या सखोल पुनरीक्षणाचा मुद्दा दोन्ही सभागृहात गाजला. या विषयावर तातडीने चर्चा करण्याची मागणी करत विरोधी पक्षाच्या सदस्यांनी जोरदार घोषणाबाजी केल्यामुळे दोन्ही सभागृहांचं कामकाज अनेक वेळा तहकूब झालं. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजीजू यांनी शांततेचं आवाहन केल्यानंतरही विरोधक चर्चेसाठी आग्रही राहिले. त्यामुळे लोकसभेचं कामकाज आधी दोन वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

त्याआधी सखोल पुनरीक्षणावर तातडीने चर्चा सुरू करण्याची मागणी विरोधी पक्षांनी लावून धरली. लोकशाही आणि नागरिकांच्या हितासाठी ही चर्चा होणं गरजेचं आहे, असं राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे म्हणाले.

तर विरोधकांच्या घोषणाबाजीवर संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी नाराजी व्यक्त केली. सरकार सर्व विषयांवर चर्चा घडवून आणण्यासाठी तयार आहे. मात्र सगळ्या चर्चा आत्ताच व्हाव्यात हा विरोधकांचा अट्टाहास योग्य नाही, नवे नवे मुद्दे शोधून संसदेच्या कामकाजात अडथळा आणणं बरोबर नाही असं रिजिजू संसद भवन परिसरात वार्ताहरांशी बोलताना म्हणाले.

**होल्ड बाईट किरेन रिजीजू**

सकाळी अकरा वाजता लोकसभेचं कामकाज सुरू झालं तेव्हा सभापती ओम बिर्ला यांनी जॉर्जियाच्या संसदीय शिष्टमंडळाचं स्वागत केलं.

सभापतींनी प्रश्नोत्तराचा तास पुकारल्यानंतर विरोधी पक्ष सदस्यांनी मतदारयाद्यांच्या सखोल पुनरीक्षणासह इतर मागण्यांवर चर्चा करण्याची मागणी करत घोषणाबाजी सुरू केली. या गदारोळातच मंत्र्यांनी सदस्यांच्या प्रश्नांना उत्तरं दिली. त्यानंतर विरोधी पक्ष सदस्यांनी हौद्यात उतरून घोषणाबाजी करायला सुरुवात केली.

सभागृह तहकूब होऊन दुपारी बारा वाजता कामकाज पुन्हा सुरू झाल्यावर प्रश्नोत्तराचा तास पुन्हा सुरू झाला. विकसित भारताचं उद्दिष्ट गाठण्यासाठी सर्व राज्यांमधल्या सर्व क्षेत्रात विकास व्हायला हवा असं मत्सव्यवसाय, पशुसंवर्धन आणि

दुग्धव्यवसाय मंत्री राजीव रंजन सिंह एका प्रश्नाला उत्तर देताना म्हणाले. प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजनेमुळे मत्स्यव्यवसायात मोठं परिवर्तन घडल्याचं त्यांनी सांगितलं.

ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी सरकारने सहकार क्षेत्रात अनेक परिवर्तनकारी पावलं उचलली, असं केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितलं.

दुपारी दोन  वाजता सभागृहाचं कामकाज सुरू झाल्यावर पुन्हा एकदा प्रश्नोत्तराचा तास सुरू झाला. पीएम किसान योजना सुरू झाल्यापासून या योजनेद्वारे आतापर्यंत २१ हप्त्यांमधे शेतकऱ्यांना ४ लाख  कोटी रुपये मदत वितरित केल्याची माहिती केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी लोकसभेत एका प्रश्नाला उत्तर देताना दिली. शेतकरी केंद्रित डिजिटल पायाभूत सुविधांमुळे कोणत्याही मध्यस्थाशिवाय शेतकऱ्यांना थेट लाभ दिला जातो असं चौहान म्हणाले. यानंतर घोषणाबाजी न थांबल्यामुळे सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

**राज्यसभेतही** मतदारयाद्यांच्या सखोल पुनरीक्षणाविषयी चर्चा करण्याची मागणी करत विरोधकांनी घोषणाबाजी केल्यामुळे कामकाज दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं होतं. त्यानंतर सभागृहाचं कामकाज पुन्हा सुरू झालं. मणिपूर वस्तू आणि सेवा कर सुधारणा विधेयक २०२५ वर सभागृहात चर्चा सुरू आहे.

**<><><><><>**

नाशिक जिल्ह्यातल्या पिंपळगाव बसवंतच्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या बसला आज कराड जवळ झालेल्या अपघातात ४५ विदयार्थी आणि शिक्षक जखमी झाले. वाठार पुलाजवळ या बसचं संतुलन बिघडून ती २० फूट खोल दरीत कोसळली. जखमींना कराड इथल्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

**//<><><><><>//**